# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१५३/१५४

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com

**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र. मरातंशिमं/का-५०/से.अ.उ./२०२२/५००९
दिनांक : 2 5 AUG 2022

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नीत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम
राबविणा-या सर्व संस्था तसेच स्वायत्त तंत्रनिकेतने.

विषय :- **कोविड-१९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात.**

संदर्भ :- शासन पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२१७/विशि-३, दि. २४.८.२०२२

उपरोक्त संदर्भिय शासन पत्रान्वये कोविड-१९ साथीच्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अध्ययन – अध्यापन प्रक्रियेमधील उणिवा दूर करण्यासाठी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक कमी भरुन काढण्यासाठी Bridge Course घेणे गरजेचे आहे. ऑनलाईन शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता त्यांचे शैक्षणिक नुकसान / शैक्षणिक कमी भरुन काढण्याच्या दृष्टीने "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्याबाबत शासनाने उद्दिष्टे नमूद केलेली असून कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. या उपक्रमासाठी संस्थेच्या प्राचार्यांनी स्वतंत्र समिती गठीत करुन अध्यापन पध्दतीचे सविस्तर नियोजन करुन, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासणी करुन उपक्रम राबविण्यात यावा. उपायात्मक अध्यापन प्रक्रियेनंतर निदानात्मक कसोटीचे आयोजन करुन अपेक्षित ज्ञान आकलन झाले असल्याची खातरजमा करण्यात यावी. सदर उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम सत्रासाठी १५ ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्यात यावा व द्वितीय सत्र सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यांत यावा असे शासनाचे निर्देश आहेत. सदर उपक्रमात सहभागी होऊन समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांनी द्यावे. शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदर उपक्रम राबविल्याबाबतची माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर I Sechme Implementation यामध्ये Teaching Learning Process या Module मध्ये प्रत्येक १५ दिवसानंतर भरावी. याबाबतची माहिती भरल्याची खात्री संस्थेच्या प्राचार्यांनी करावी. त्याची तपासणी मंडळामार्फत अवेक्षण समितीमार्फत अवेक्षणाच्यावेळी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी कोविड-१९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता सेतू अध्ययन उपक्रम राबविण्याबाबत संस्था स्तरावर उचित कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण, मुंबई

सोबत :- वरीलप्रमाणे
प्रत माहितीसाठी सादर-

- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
त्यांना कळविण्यांत येते की, याबाबतचा वेळोवेळी आढावा घेण्यांत यावा.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१
Email ID:- vishi३-hted@mah.gov.in hted.vishi३-mh@gov.in

---

क्रमांक:-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२१७/विशि-३ दिनांक:- २४ ऑगस्ट, २०२२

प्रति,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे
२. मा. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३. मा. कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
४. मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड

विषय:- कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" रार्बावण्यासंदर्भात.

संदर्भ:- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२२/ कोविड-१९/मवि-१/१०८१२, दि. २२ ऑगस्ट, २०२२

महोदय/ महोदया,

कोविड-१९ साथीच्या कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता त्यांचे शैक्षणिक नुकसान / शैक्षणिक कमी भरुन काढण्याच्या दृष्टीने सेतू अध्ययन उपक्रम रार्बावण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु यांच्यासमवेत दि. २०/०८/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीत सर्वच कुलगुरुंनी असे नमूद केले की, ऑनलाईन पध्दतीने अध्ययन-अध्यापन प्रकियेमध्ये शिक्षणाचा अपेक्षित दर्जा राखता येण्यामध्ये काही मर्यादा आल्या असल्याचे निरीक्षण नोंदविले असून विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययननिष्पत्ती साध्य झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच सदरहू घटकांसाठी अधिक अध्यापनाची आवश्यकता असल्याचे कुलगुरुंनी नमूद केले. सदर बाब लक्षात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमधील उणीव दूर करण्यासाठी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक कमी भरुन काढण्यासाठी Bridge Course असावा अशी आवश्यकता सर्वच कुलगुरुंनी व्यक्त केली. काही विद्यापीठांनी याबाबत कार्यवाही सुरु केली असल्याचे सुध्दा नमूद केले. तथापि, सर्व विद्यापीठांमध्ये समान कार्यपध्दती असावी यादृष्टीने संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सदर बैठकीत निर्देश देण्यात आले होते. त्यासअनुसरुन संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत असून त्यानुसार तातडीने विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**उपक्रमाचे नाव :** कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता सेतू अध्ययन उपक्रम

**उद्दिष्टे :-**

१. पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची सत्र व विषयनिहाय प्रत्यक्ष अध्यापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांची निवड करणे.
२. यासाठी निदानात्मक चाचणीचे आयोजन करुन चाचणीच्या निष्कर्षाचे आधारे घटक निश्चिती करणे.
३. सदरहू चाचणीच्या विश्लेषणावरुन उपायात्मक प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन उपक्रम प्रात्यक्षिकांसह राबविणे.
४. उपायात्मक अध्ययन-अध्यापन करुन विद्यार्थ्यांचा संबंधित विषयाचा अध्ययन स्तर उंचावणे.

**उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती :**

१. सदर उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला सर्व विषयांसाठी राबविण्यात यावा. सदर उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल.
२. सदर उपक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्रत्येक विषय शिक्षकाची राहील.
३. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुख यांनी सदर उपक्रमासाठी स्वतंत्र समिती गठीत करावी.
४. पूर्वज्ञानावर आधारित नवीन सत्रातील विषयज्ञान आकलन करण्यासाठी विषयज्ञान, संकल्पना स्पष्टता, आकलन, उपयोजन, पृथःकरण/ संश्लेषण आणि टीकात्मक मूल्यमापन या स्तरांवर आधारित पूर्वज्ञान तपासणारी निदानात्मक चाचणी आयोजित करावी.
५. निदानात्मक चाचणी ही संबंधित विषयाच्या अध्यापकाने सदरहू विषयासाठी आवश्यक असणाऱ्या पूर्वज्ञानावर तयार करावी. ज्यायोगे सदरहू चाचणीच्या निकालाद्वारे विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करणे सुलभ होईल.
६. विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करुन सदरहू घटकासाठी गरजेप्रमाणे अध्यापन तासिकांचे वर्ग व अध्यापन पध्दतीचे नियोजन करुन समृध्द उपायात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रमाची योजना तयार करावी. यामध्ये ज्या विषयांना प्रात्यक्षिक (Practicals) असतात अश्या प्रात्यक्षिकांचा सुध्दा समावेश असावा.
७. प्रत्येक विषयासाठी अध्यापनाच्या आवश्यकतेनुसार किमान ०५ तासिका असाव्यात.
८. सदरहू सेतू अध्ययन उपक्रमाचे वेळापत्रक विभाग समिती / महाविद्यालयांनी तयार करुन वेळापत्रकाची अंमलबजावणी विभाग / महाविद्यालय यांच्या स्तरावर सत्र प्रारंभी तात्काळ करावी. ज्या ठिकाणी यापूर्वी सत्र सुरु झाले आहे त्या ठिकाणी पुढील अध्यापन सुरु करण्यापूर्वी करण्यात यावे.
९. पूर्वज्ञान समृध्द होण्यासाठी सदरहू घटकांना अनुरुप असे संदर्भ ग्रंथ, साहित्य, वेब साहित्य इत्यादी बाबतची यादी उपलब्ध करुन देण्यात यावी.
१०. उपायात्मक अध्यापन प्रक्रियेनंतर निदानात्मक कसोटीचे आयोजन करुन अपेक्षित ज्ञान आकलन झाले असल्याची खातरजमा करण्यात यावी.
११. सदरहू उपक्रमात समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.
१२. सदर उपक्रम प्रथम सत्रासाठी १५ ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्यात यावा. व्दितीय सत्र सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे.

१३. सदर उपक्रम उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण मधील सर्वच अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात यावा. यासाठी कोणताही स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
४. निवडनस्ती (विशि-३)